## The Kolhapur Obstetrics & Gynaecological Society


# II ZONAL CONFERENCE-89

Chief Guest



**Dr. D. Y. Patil**

Chief Guest



**Dr. Subhash Salunkhe**

Chairman



**Dr. S. J. Kudalkar**

President



**Dr. K. V. Argade**

Secretary



**Dr. C. G. Gaikwad**

Organising Secretary



**Dr. Mrs. Radhika Joshi**

# कथा बिनटाक्याच्या नसबंदीची

## डॉ. विदुला जोशी

दचकू नका, मी तुम्हाला लॅप्रास्कोपीचा इतिहास सनावळी सांगून अजिबात कंटाळा आणणार नाहिये. ही गोष्ट आहे मी केलेल्या पहिल्या नसबंदी शस्त्रक्रियेची.

मुंबई शहर युरोपपासून हजारो कोस दूर आहे. त्यामुळे सहाजिकच तिकडे जे काही नवीन शोध लागतात, त्याचे ज्ञान आपल्याकडे झिरपत यायला काही वर्षे सहज लागतात. कोल्हापूर हे मुंबईपासून जवळ जवळ ३०० मैल दूर. तेव्हा सहाजिकच मुंबईची तज्ञ माणसे ज्या काही नवीन गोष्टी शिकतात ते आमच्यापर्यंत येईपर्यंत सहज पांच-सहा वर्षे उलटलेली असतात.

काळ वेगाने बदलत आहे. वैद्यकीय क्षेत्रात नवनवीन शोधांनी प्रचंड उलथापालथ होत आहे. सध्या जमाना आहे सोनोग्राफीचा. त्याच्याही आधी जमाना होता एण्डोस्कोपीचा, लॅप्रास्कोपीचा.

एक दिवस आमच्या वरिष्ठांना खलीता आला की, वाडिया रूग्णालयाचे एक पथक सावित्रीबाई फुले रूग्णालयात येऊन बिनटाक्याच्या शस्त्रक्रिया करु इच्छितात. ठरलेल्या तारखेला सदरहू १०-१२ जणांचे पथक येऊन पोहोचले. आम्ही सर्व पेशंटस् तयार करून ठेवले. सदरहू पथकाने २५-३० ऑपरेशन्स हा हा म्हणता उरकून टाकली व संध्याकाळी मुंबईला गेली सुद्धा ! पेशंटसुद्धा संध्याकाळी घरी परत !

आमचे वरिष्ठ हे तंत्र पाहून फारच प्रभावित झाले. आपणसुद्धा एक लॅप्रास्कोप घ्यावयाचाच असे त्यानी मनोमन ठरवून टाकले. पेशंटला दवाखान्यात ठेवायला नको, म्हणजे खर्च कमी. रोज खूपच ऑपरेशन्स करता येतील. म्हणजे महापालिकेचा भारतात पहिला नंबर. त्यानंतर परदेशवारी (तो काळ आणीबाणीचा होता) वगैरे वगैरे. वरिष्ठ अधिकारी स्वप्ने रंगवू लागले. लगेच स्टॉर्झ कंपनीच्या लॅप्रास्कोपची ऑर्डर दिली सुद्धा.

आता नवीन हत्यार आणावयाचे तर ते वापरता आले पाहिजे. आम्हा दोन मेडिकल ऑफिसरना प्रशिक्षणासाठी पाठवून देण्याचा ठराव लगबगीने मंजूर करण्यात आला.

आम्ही मुंबईला वाडिया हॉस्पिटलमध्ये येऊन पोहोचलो. क्लिनिक सुरु झाली. हत्यारांची ओळख करून दिली. हाऊसमन रजिस्ट्रारने सांगितलेली सर्व कामे विनातक्रार केली. पण त्यांनी फक्त धुण्यापुरताच लॅप्रास्कोपला हात लावून दिला. महिन्याचे प्रशिक्षण संपत आले. एक दिवस आम्हाला सांगितले की, सुरतला नसबंदी शिबिर आहे आपण जायचे. खूप पेशंट येतील व आपल्याला सगळे करायला मिळेल अशी गोड आशा वाटू लागली.

शिबीराची सुरवात झाली. मला एका रजिस्ट्रारच्या हवाली करण्यात आले. ती पहिले सर्व सोपस्कार करावयाची. म्हणजे हवा करणे, ट्रोकार घालणे, वगैरे. नंतर ती सर्व टयुब्ज मुख्य ॲप्लिकेटर व्हिजनमध्ये आणून ठेवायची आणि म्हणायची आता लावा क्लिप. म्हटले हेही नसे थोडके.

प्रशिक्षण संपवून मी कोल्हापूरला आले. लॅप्रास्कोप आमच्या आधीच पोहोचलेला होता. चला आता भराभर कामाला सुरवात करायची. रोज किमान २, ३ शस्त्रक्रिया झाल्या तरी बास. म्हणजे महापालिकेचा पहिला नंबर ठेवलेलाच.

पेशंटला लॅप्रास्कोपिक ऑपरेशनचे फायदे समजावून सांगता सांगता तोंड दुखू लागले. परंतु त्या कांही बधेनात. त्या म्हणत आम्ही ७ दिवस दवाखान्यात राहतो, पण ऑपरेशन टाक्याचेच.

शेवटी कसेबसे एका पेशंटला बिनटाक्याच्या ऑपरेशनला तयार केले.

आज पेशंटचे ऑपरेशन, आपल्या प्रशिक्षणाचे आज सार्थक होणार. काळीज उगीचच धडधडू लागले. आज दिवसही चांगला होता, म्हणजे आकाश निरभ्र होते, सूर्य तेजाने तळपत होता.

पेशंटला टेबलावर घेतले, योग्य ती इंजेक्शन्स दिली, हत्यारे व्यवस्थित आहेत की नाही ते तपासले, हवा भरण्याचे यंत्र, दिवा वगैरे. रुग्णालयातले सर्व वैद्यकीय अधिकारी, नर्सेस सर्वजण ही नवीन पद्धतीची शस्त्रक्रिया बघण्यास अगदी उत्सुक झाले होते.

मी तयार, पेशंट टेबलावर तयार, हत्यारे तयार, सर्वजण तयार. एवढ्यात प्रचंड स्फोटासारखा आवाज होऊन सर्व दिवे गेले. कुठे तरी मोठा बिघाड झाल्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला होता व दुरुस्ती होण्यासाठी पुरा दिवस लागणार होता. ऑपरेशन रद्द करण्याशिवाय मार्गच नव्हता.

एखाद्या फुग्याला टाचणी लावावी तसा माझा चेहरा पार आकसून गेला. माझे पहिले वहिले ऑपरेशन अशा रीतीने रद्द झाले. काही हरकत नाही, उद्या करू या, मी मनात म्हटले. पेशंटला वॉर्डात पाठवून दिले.

दुसऱ्या दिवशी मी ऑफिसमध्ये बसलेली असताना एक म्हातारी बाई तरातरा माझ्याकडे आली आणि म्हणाली, ''हे बघा बाई, माझ्या सुनेचे बिन-टाक्याचे ऑपरेशन करायचे नाही, टाक्याचे ऑपरेशन करा, कितीबी दीस लागू दे'' झाले. तिचे नेहमीच्या पद्धतीने ऑपरेशन करण्यात आले.

अशी आहे कथा माझ्या पहिल्या बिनटाक्याच्या नसबंदी शस्त्रक्रियेची ! □ □

